# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ३० मार्च, २०१७ / चैत्र ९, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**<br>**(२) ग्रामविकास, महिला व बाल कल्याण मंत्री**<br>**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**<br>**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**<br>**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार मंत्री**<br>**(६) रोजगार हमी योजना, पर्यटन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५२**

---

### जवाहर वैद्यकिय महाविद्यालय आणि परिचारिका महाविद्यालयातील (जि.धुळे) विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याबाबत

**(१) * २९६०७ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जवाहर वैद्यकिय महाविद्यालय आणि परिचारिका महाविद्यालयातील (जि.धुळे) विद्यार्थ्यांना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान अन्नातून झालेल्या विषबाधेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) विषबाधेच्या सदर घटनेच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाद्वारे सदर महाविद्यालयातील मेसची तपासणी करण्यात आली. तपासणीच्यावेळी विषबाधेच्या घटनेच्या वेळी सेवन करण्यात आलेल्या तयार अन्न पदार्थांचा साठा आढळून आला नाही. तथापि मेसमधून ५ कच्च्या अन्न पदार्थांचे नमुने घेण्यात आले. तसेच ते कच्चे अन्नपदार्थ पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराकडून २ नमुने घेण्यात आले. विश्लेषणासाठी घेण्यात आलेले सदर सातही नमुने प्रमाणित घोषित करण्यात आले आहेत.

तपासणीदरम्यान मेसच्या स्वयंपाकगृहात अन्न सुरक्षा व मानके (परवाना व नोंदणी) नियमावली, २०११ मधील तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले.

तपासणी दरम्यान मेसमध्ये आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने मेसविरुध्द न्यायनिर्णय खटला क्र. ३७/२०१७, दिनांक २८/०२/२०१७ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक डिमट्रेंड शिक्षकांना चौथ्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत

**(२) * ३०२०४ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २२६६० ला दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक डिमट्रेंड शिक्षकांना चौथ्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी व १८ वर्षे पूर्ण केलेल्या शिक्षकांना निवडश्रेणीच्या रुपाने सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास निर्णय दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात अपील/पुनर्विचार याचिका दाखल करण्याची कार्यवाही करण्याबाबत तसेच दरम्यानच्या कालावधीत मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होऊ नये म्हणून विधी व न्याय विभाग, औरंगाबाद यांचा सल्ला घेऊन ताबडतोब कार्यवाही करण्याबाबत संबंधित प्रतिवाद्यांना कळविण्यात आले आहे.

-----------------

**ठाणे सिव्हील रुग्णालयातील गैरसोई दूर करण्याबाबत**

**(३) * २७५४० अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील सिव्हील रुग्णालयाच्या मागील बाजूस सांडपाण्याच्या टाक्या फुटल्याने रुग्णालयाच्या आवारात अस्वच्छता पसरली असून, रुग्णालयातील उद्वाहने वारंवार बंद असून त्यांची दूरवस्था झाल्याचे दिनांक १९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्णालयात स्वच्छता राखण्यासाठी व बंद पडणारी उद्वाहने पूर्ववत सुरु करुन रुग्णांची गैरसोय दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) ठाणे सिव्हील रुग्णालय व कर्मचारी वसाहतीचे सांडपाणी वाहून नेणारा पाईप महानगरपालिकेच्या सांडपाणी वाहिनेस जोडलेला आहे. दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी महानगरपालिकेची मुख्य सांडपाणी वाहिनी पूर्णपणे भरल्यामुळे जिल्हा रुग्णालयाच्या कर्मचारी वसाहतीच्या सांडपाण्याचा निचरा होत नव्हता. त्यामुळे सांडपाणी आवारात काही प्रमाणात पसरले होते. याबाबत ठाणे महानगरपालिकेकडे तक्रार केल्यानंतर सदर सांडपाण्याचा निचरा करण्यात आला होता. रुग्णालयाच्या दोन्ही इमारतीमध्ये प्रत्येकी १ उद्वाहन कार्यरत असून दुरुस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत विभागामार्फत आवश्यकतेनुसार करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भिवंडी येथील स्व.इंदिरा गांधी रुग्णालयाची (जि.ठाणे) दूरवस्था झाल्याबाबत**

**(४) * २७२९४ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिंवडी निजामपुर महानगरपालिकेच्या मालकीचे असलेले १०० बेडचे स्व.इंदिरा गांधी रुग्णालय हे २०११ पासून शासनाकडे वर्ग झाल्यानंतर त्याची दूरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकिय आरोग्य विभागातर्फे दिनांक १७/१/२०१३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखडा यामध्ये अशा प्रकारची रुग्णालये चालविण्याकरिता लागणारा निधी, अधिकारी व तत्सम अधिकारी यांची कमतरता, त्यांचे पगार याबाबतची टिपणी या विभागातील प्रधान सचिवांनी निर्देश पत्र-अ प्र.क्र.६८/२०१६, नस्ती क्र. मिभा-१११६/प्र.क्र.६८/१६/२०१६ न.वी.२८ यांना सादर करताना उल्लेखित केल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे का,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे पंडित भीमसेन जोशी रुग्णालय सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळास नगरविकास विभागामार्फत नस्ती क्र.मिभा-१११६/प्र.क्र.६८/१६/२०१६/ न.वी.२८ अन्वये सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने दिनांक ४/७/२०१६ च्या टिप्पणीन्वये नगरविकास विभागाच्या प्रस्तावावर सार्वजनिक आरोग्य विभागाकडून अभिप्राय देण्यात आले. त्यात भिवंडी येथील स्व.इंदिरा गांधी रुग्णालयाच्या हस्तांतराच्या वेळी आलेल्या अडचणींचा उल्लेख करण्यात आला होता.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बा-हाळी (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील कुंद्राळा धरणाचा डावा कालवा फुटून झालेल्या नुकसानीबाबत**

**(५) * ३०४४० श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बा-हाळी परिसरात (ता.मुखेड, जि.नांदेड) असलेल्या कुंद्राळा धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने डावा कालवा फुटून लाखो लिटर पाणी वाया गेल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रकल्प पूर्ण होवून ४० पेक्षा जास्त वर्ष झाली असल्याने त्याच्या कालवा व वितरणप्रणालीमध्ये काही प्रमाणात नादुरूस्ती झाली आहे.

जानेवारी, २०१७ मध्ये डाव्या कालव्यावरील सा.क्र.६८० मी. येथील जलसेतुजवळ कालवा ३ मी. लांबीमध्ये फुटला होता. कालव्याची आवश्यक दुरुस्ती तातडीने करुन कालवा सुस्थितीत आणून विसर्ग प्रवाहीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्हयातील मुद्रा योजनेचा निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(६) * २९९९७ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने भंडारा जिल्हयातील बेरोजगार युवकांसह उद्योग व्यावसायिकांना रोजगार उभारण्यासाठी सुलभतेने कर्ज मिळावे याकरिता राज्यात मुद्रा योजना राबविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या प्रचार, प्रसार, जनजागृती करीता रुपये २१ लाखांचा निधी जिल्हयाला प्राप्त झाला आहे, मात्र या योजनेसाठी समिती स्थापन न केल्यामुळे या योजनेसाठी आलेला निधी अजून अखर्चित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक ३१ मार्च, २०१७ पूर्वी निधी खर्च केला नाही तर परत जाण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुद्रा योजनेचा निधी परत जाऊ नये तसेच समिती स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२), (३) व (४) भंडारा जिल्हयाकरीता रुपये २१.२५ लक्ष निधी उपलब्ध करण्यात आला असून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर निधी ३१ मार्चपूर्वी खर्च करण्याच्यादृष्टीने खर्चाचे नियोजन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील आरोग्य अभियानातील अधिकारी मनमानी करुन 'आशा' स्वयंसेविकांचे जबरदस्तीने राजीनामे घेत असल्याबाबत**

**(७) * २७३७९ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या आरोग्य अभियानातील अधिकारी मनमानी करुन राज्यातील 'आशा' या स्वयंसेविकांचे जबरदस्तीने राजीनामे घेत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषी अधिका-यांवर कारवाई करुन संबंधित स्वयंसेविकांवरील अन्याय दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिरवळ-पळशी-वडगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) या रस्त्याचे डांबरीकरण, रुंदीकरण व मजबुतीकरण करण्याबाबत

**(८) * ३०५९७ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरवळ-पळशी-वडगाव (ता.खंडाळा, जि.सातारा) रस्ता हा इजिमा ८ दर्जाचा असून मोठया प्रमाणावर झालेल्या औद्योगिकरणामुळे तसेच शेती व इतर अनुषंगिक व्यवसायामुळे वाहतुकीची वर्दळ वाढल्यामुळे सदरहू रस्त्याचे डांबरीकरण, रुंदीकरण व मजबुतीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषद, सातारा यांना सन २०१५-२०१६ मध्ये सचिव, ग्रामविकास विभाग यांच्याकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू रस्त्याचे डांबरीकरण, रुंदीकरण व मजबुतीकरण तात्काळ करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्नांकित रस्त्याचे सन २०१६-१७ मध्ये सा.क्र.६/५०० मध्ये लहान पूल/मोरी बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मंजूर आहे. ०/०० ते ३/५०० कि.मी. या लांबीमध्ये प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सन २०११ मध्ये रस्ता डांबरीकरणाचे काम झालेले आहे. सदर लांबी सुस्थितीत आहे. उर्वरीत ३/५०० ते ७/५०० कि.मी. लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम जिल्हा वार्षिक योजना/रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत प्राधान्यक्रमाने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यात वडाळी वन विभागाने संरक्षण कुंपणास निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याबाबत

**(९) * २८०४५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात वडाळी वन विभागाने सन २०१५ मध्ये जुने बायपास, वडाळी, वडरपुरा, पंचशिलनगर, आशियाना क्लब, वीटभट्टी परिसरात तसेच अन्य ठिकाणी वन जमिनींवर अतिक्रमण होऊ नये म्हणून संरक्षण कुंपण घालताना वन सीमा निश्चितीसाठी वापरण्यात आलेले सिमेंटचे आरसीसी पिलर हे निष्कृष्ट दर्जाचे असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुपये तीन लाखांच्यावरील कामे ई-निविदा प्रक्रियेद्वारे करण्याचे शासनाचे आदेश असतांनाही आरसीसी पिलर लावतांना वन विभागाने शासनाचे आदेश डावलले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विनानिविदा केलेल्या या कामांमध्ये गैरव्यवहार झालेला असून शासनाच्या निधीचा अपहारही झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमबाह्य कामांना आळा घालून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) ज्या वनक्षेत्राचे सीमांकन करण्यात आले आहे, ते वनक्षेत्र नागरी भागात असून ते अतिक्रमणाच्यादृष्टीने अतिसंवेदनशील असल्यामुळे तातडीने सीमांकन करण्यासाठी प्रशासकीय निकड लक्षात घेता, विभागीयरित्या कामे करण्यात आली आहेत.

(३) व (४) सदर कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे दोषींवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी**
**पात्र विद्यार्थ्यांची यादी जाहिर केल्याबाबत**

**(१०) * ३०३५५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी एकूण २ हजार ९६० जागा आहेत. विभागाच्या संकेतस्थळावर दिनांक २८ ऑगस्ट, २०१६ रोजी जागा शिल्लक असल्याची सुचना प्रकाशित केली त्यात केवळ २ हजार ५१७ पात्र विद्यार्थ्यांची यादी जाहिर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित २८५ रिक्त जागांबाबत वैद्यकीय शिक्षण विभाग माहिती देत नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सीईटी परिक्षा दिलेले पात्र विद्यार्थी उपलब्ध असताना जागा रिक्त ठेवण्यामागील कारणे काय आहेत व या गुणवंत विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायास जबाबदार अधिका-यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**साठवण तलाव ममदापूर (ता.येवला, जि.नाशिक) या योजनेचा**
**सुधारित प्रस्ताव तांत्रिक मंजुरीअभावी रखडल्याबाबत**

**(११) * २७१८५ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक २३६०९ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साठवण तलाव ममदापूर (ता.येवला, जि.नाशिक) या योजनेच्या वन जमीन प्रस्तावासाठी पर्यायी जमीन उपलब्ध करुन देण्याची मागणी जलसंधारण विभागाने नाशिक जिल्हा प्रशासनाकडे दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचा सुधारित प्रस्ताव तांत्रिक मंजुरीअभावी प्रलंबित असल्याने माहे जानेवारी, २०१६ पर्यंत सदर योजनेची निविदा प्रक्रिया झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय. तथापि, योजनेचा तांत्रिक मान्यतेचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, नाशिक यांनी दिनांक ०७/०३/२०१७ च्या पत्रान्वये मंजुरीसाठी मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे कार्यालयास सादर केलेला आहे. त्यास मान्यतेनंतर सदरची निविदा कार्यवाही नियमानुसार केली जाईल.

(३) अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पेंच व्याघ्र प्रकल्पातील दोन वाघिणींचा मृत्यू झाल्याबाबत**

**(१२) * २७६५९ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंच व्याघ्र प्रकल्पातील दोन वाघिणींचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाघिणींच्या मृत्यूची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) पेंच व्याघ्र प्रकल्पात माहे जानेवारी, २०१७ मध्ये एक वाघिण मृतावस्थेत आढळून आली असून तिचा मृत्यू हा Respiratory Failure मुळे असू शकतो असे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे, तरी पुढील तपासणीसाठी सदर वाघिणीचा विसेरा व घटनास्थळाजवळील पाणवठ्यातील पाण्याचे नमुने न्यायसहाय्यक प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यात आलेले आहेत. तसेच माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये एक वाघ मृतावस्थेत आढळला. दोन वाघांच्या झुंजीत झालेल्या अतिरक्तस्त्रावामुळे सदर वाघाचा मृत्यू झाला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात प्रत्येक जिल्हयात सार्वजनिक व खाजगी सहभागातून वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(१३) * २७६९९ डॉ.अपूर्व हिरे, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २४१०२ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ज्या जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अस्तित्वात नाही, अशा जिल्हयात खाजगी भागीदारीतून आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालयात संलग्नित वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याच्या विचाराधीन प्रस्तावावरील शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, शासकीय रुग्णालये व खाजगी सहभाग (खाजगी संस्था/व्यक्ती/स्वयंसेवी संस्था) यांच्यामध्ये यानुषंगाने सामंजस्य करार (M.O.U.) करण्याबाबतची सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, राज्यात ज्या जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालये नाहीत, अशा सर्व जिल्हयात सार्वजनिक-खाजगी सहभागातुन वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याच्या शासनाच्या निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे व कोणकोणत्या जिल्हयात अशी वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) नाही,

सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सामंजस्य करार (M.O.U.) तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहिर करण्याबाबत**

**(१४) * २९४६८ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१६ मध्ये या वर्षात पर्यटन धोरणात ज्या जिल्हयात पर्यटन विकासाला वाव आहे तो जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहिर केला जाईल असे स्पष्ट केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हयात समुद्र किनारे, ऐतिहासिक मंदिरे, धबधबे, गडकिल्ले, सुंदर निसर्ग स्थळे असतांनाही रत्नागिरी जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहिर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) पर्यटन धोरण २०१६ मध्ये शासन आवश्यकतेनुसार इतर विशेष पर्यटन क्षेत्रे/इस्टेट घोषित करील अशी तरतूद आहे.

(२) व (३) या प्रकरणी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे.

-----------------

**मौजे सरकोली-पुळूज बंधा-यातील पाणीगळती थांबविण्याबाबत**

**(१५) * २९६६० श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सरकोली येथे पाणी अडविण्यासाठी भीमा नदीवर कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे चळे, आंबे, मुंढेवाडी, सुस्ते, पोहरगाव, विटे, तारापूर, खरसोळी या गावातील हजारो हेक्टर क्षेत्र ओलीताखाली आणण्यास मदत झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बंधाऱ्यातून पाण्याची गळती झाल्यामुळे स्थानिक नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदने दिली आहेत तसेच सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने ठेकेदाराची नेमणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बंधा-यातून पाणी गळती थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

सरकोली कोल्हापूर पध्दतीचा बंधारा हा भीमा नदीवर नसून तो माण नदीवर सन १९९८ मध्ये बांधण्यात आला आहे.

(२) सदरची गावे सरकोली कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या लाभक्षेत्रात येत नाहीत.

(३) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसंदर्भात स्थानिक नागरिकांची निवेदने प्राप्त झालेली नाहीत. तथापि, कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यात दरवर्षी पाणी अडविण्यासाठी (बर्गे बसविणे व काढणे) क्षेत्रियस्तरावर निविदा निश्चित करुन कामे केली जातात.

सन २०१४-१५ मध्ये सरकोली बंधाऱ्याचे दुरुस्ती, नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) या केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संजीवनी नर्सिंग होम, हडपसर (जि.पुणे) येथे डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे रुग्णाचा मृत्यू झाल्याबाबत

**(१६) * २८४२८ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजीवनी नर्सिंग होम, हडपसर (जि.पुणे) येथे रुग्ण महिला विद्या अभिजित कदम हिचा डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत दोषी आढळून येणा-या संबंधित डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे,

संजीवनी नर्सिंग होम हडपसर, पुणे येथे रुग्णनामे विद्या अभिजित कदम या रुग्णेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला हे खरे आहे.

परंतु सदर मृत्यू डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे झालेला असल्याबाबत, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील नियुक्त चौकशी समितीच्या अहवालात कोठेही नमूद नाही.

(२) उक्त प्रकरणाची कागदपत्रे हडपसर पोलीस स्टेशन पुणे यांचेमार्फत ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांचेकडे दिनांक ७/१२/२०१६ नुसार चौकशीकामी प्राप्त झाली होती. ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांचेमार्फत सदर प्रकरणी चौकशी समिती नियुक्त करुन समितीचा अहवाल दिनांक २६/१२/२०१६ नुसार पोलीस स्टेशन यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर, ठाणे जिल्ह्यात अपंगांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र सुलभरित्या मिळण्याबाबत

**(१७) * २८१२१ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा स्वतंत्र झाला असला तरी तेथील अपंगाना अद्याप अपंगाच्या दाखल्यासाठी ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात यावे लागते, परंतु ठाणे जिल्हा रुग्णालयातील मंदगतीच्या कारभारामुळे अपंगांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर, ठाणे जिल्ह्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यात अपंगत्वाचे प्रमाणपत्र अपंगांना सुलभरित्या मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

दिव्यांग प्रमाणपत्राचे प्रत्यक्ष कामकाज जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, पालघर येथे दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ पासून सुरु करण्यात आले आहे. त्यांच्या स्तरावरुन पालघर जिल्हयातील अपंगांना दर बुधवारी अपंग प्रमाणपत्र देण्यात येते. दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ ते दिनांक ८ मार्च, २०१७ पर्यंत एकूण दाखल ९९० अर्जांपैकी ६८८ उमेदवारांना अपंग प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आलेले आहे

(२) राज्यात ३५ सार्वजनिक आरोग्य विभागातील रुग्णालये, १५ वैद्यकीय महाविद्यालय व २ इतर संस्था (अली यावर जंग श्रवण संस्था, बांद्रा व हाजी अली मुंबई) अशा एकूण ५२ ठिकाणी अपंगाचे प्रमाणपत्र देण्यात येते. अपंगाना अपंग प्रमाणपत्र सुलभरित्या मिळण्यासाठी संचालनालय स्तरावरुन वेळोवेळी जिल्हा शल्य चिकित्सक व वैद्यकीय अधिक्षक यांना मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुपर स्पेशालिटी रुग्णालय, नागपूर येथे येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांकरीता प्रतिक्षालयाचे बांधकामास मंजूरी देण्याबाबत

**(१८) * २८७०६ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुपर स्पेशालिटी रुग्णालय, नागपूर येथे येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांकरीता प्रतिक्षालयाचे बांधकामास मंजूरी मिळूनही सदर प्रतिक्षालयाचे बांधकाम प्रस्तावित जागेवरील ३ झाडामुळे प्रलंबित असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) संस्थेने सदर जागेचा नकाशा नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना सादर केला असता, त्यांनी सदर जागेवरील तीन झाडे तोडून नविन १५ झाडे लावून त्यांची वाढ होईपर्यंत जोपासना करण्याच्या अटीचे पालन होण्याच्या दृष्टीने रुपये २२,०००/- रोख स्वरुपात डिपॉझिट भरण्याच्या अटीवर परवानगी दिली आहे.

सदर झाडे तोडण्याऐवजी झाडे नसलेली जागा शोधून तेथे प्रस्तावित बांधकाम संस्थेने करणे योग्य राहील, त्यादृष्टीने संस्थास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**पुणे जिल्हयातील आरोग्य केंद्राची कामे निधीअभावी अपूर्ण असल्याबाबत**

**(१९) * २६८१९ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील २८ आरोग्य केंद्राची कामे निधीअभावी अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन २८ आरोग्य केंद्रांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे. पुणे जिल्हयात ९६ प्राथमिक आरोग्य केंद्र असून दिनांक १७/०१/२०१३ रोजीच्या आरोग्य संस्था स्थापनेच्या मंजुर बृहत आराखडयानुसार आणखी २८ प्राथमिक आरोग्य केंद्राना मंजुरी देण्यात आली आहे.

(२) पुणे जिल्हयातील २०१३ साली मान्यता दिलेल्या २८ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी ७ प्राथमिक आरोग्य केंद्रांची बांधकामे सुरु असून, १ प्राथमिक आरोग्य केंद्र अद्ययावत इमारतीत कार्यरत झाले आहे.

८ प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या बांधकामासाठी ग्रामपंचायतीकडून जागा उपलब्ध करुन घेण्यात आली असून, जिल्हा नियोजन समितीकडे अनुदानाची मागणी करण्यात आली आहे.

उर्वरीत १२ प्राथमिक आरोग्य केंद्रांना ग्रामपंचायतीकडून जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांच्यामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानातील गैरप्रकारांबाबत**

**(२०) * २७९१० श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक १९९७३ ला दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गतच्या कामात पारदर्शकतेचा व दर्जेदार कामाचा अभाव हे त्रयस्त यंत्रणेकडून तपासण्याबाबत व इतर प्रकरणांची चौकशी करण्याबाबतचे आदेश मंत्री महोदयांनी जिल्हाधिकारी, परभणी यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच जिंतुर व सेलू तालुक्यातील (जि.परभणी) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात आलेल्या सिमेंट नाला बांधकामाची कामे ज्या यंत्रणेने केली त्याच यंत्रणेकडून चौकशी करून गैरप्रकार दडपण्याचा प्रकार करण्यात आल्याने मा. मंत्री महोदयांनी विभागीय आयुक्त यांना जिल्हयाबाहेर इतर तांत्रिक अधिकाऱ्यांकडून अहवाल सादर करण्याचे आदेश सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांची निवृत्त न्यायाधिशांच्या त्रयस्त पथकामार्फत स्वतंत्रपणे चौकशी करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाधिकारी परभणी व निवृत्त न्यायाधिशांच्या पथकामार्फत उपरोक्त प्रकरणी सर्व कामांची चौकशी करण्यात आला आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, मा.मुख्य सचिव यांनी चौकशी करणेबाबत निर्देश दिले आहेत.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जिल्हाधिकारी परभणी व निवृत्त न्यायाधिशांच्या पथकामार्फत चौकशी केली नाही. तथापि उपविभागीय अभियंता, निम्न दुधना पाटबंधारे प्रकल्प यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील वांद्रे कुर्ला संकुलात आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र उभारण्याबाबत**

**(२१) * २७८४४ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलात आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र (आयएफएससी) उभारण्याचा निर्णय मा.केंद्रीय राज्यमंत्री व मा.मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेला असून गुजरात मधील गिफ्टमध्ये सुरु होत असलेल्या आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्राचे मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलातील केंद्र हे पूरक केंद्र म्हणून कार्यरत ठेवण्याचाही निर्णय घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच मुंबईतील सदर केंद्र स्वतंत्र आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र न उभारता ते पूरक केंद्र उभारण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) शासनाने दिनांक ३ डिसेंबर, २०१५ च्या शासन निर्णयानुसार मा. केंद्रीय राज्यमंत्री, नागरी विमान उड्डाण मंत्रालय यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक वित्तीय सेवा केंद्र या प्रकल्पासाठी कार्यदलाची (टास्क फोर्स) स्थापना केली. यामध्ये राज्य व केंद्र शासनाचे वरिष्ठ अधिकारी तसेच या क्षेत्रातील तज्ञ (एक्सपर्ट) यांचा समावेश आहे.

सदर कार्यदलाची (टास्क फोर्स) तिसरी बैठक दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी मा. केंद्रीय राज्यमंत्री, नागरी विमान उड्डाण, मंत्रालय यांच्या सहअध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीमध्ये, गुजरात मधील गिफ्ट व मुंबईतील वांद्रे-कुर्ला संकुलात आयएफएससी दरम्यान सहकार्याने काम करण्याचे मार्ग ओळखण्यासंदर्भात कार्यदलामध्ये (टास्क फोर्स) चर्चा करण्यात आली. तसेच कार्यदलाने हब अॅण्ड स्पोक मॉडेल नुसार परस्परांचा फायदा कसा करता येईल यावर देखील चर्चा केली आहे.

-----------------

## विरार (जि.पालघर) येथील जिल्हा रुग्णालयात तज्ञ डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२२) * ३०६८१ ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (जि.पालघर) येथील जिल्हा रुग्णालयात तज्ञ डॉक्टरांचा अभाव असून रुग्णालयाची दूरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तद्नुषंगाने सदर रुग्णालयात तज्ञ डॉक्टरांची नियुक्त करणे व सर्व सोई-सुविधा उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

विरार, जि.पालघर येथे जिल्हा रुग्णालय नसून ३० खाटांचे ग्रामिण रुग्णालय कार्यान्वित आहे. सदर रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१ संवर्गाचे १ पद मंजूर असून ते पद रिक्त आहे. सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार वैद्यकीय अधिकारी, आश्रमशाळा पथक वाडा, जि.पालघर यांच्याकडे देण्यात आला आहे.

ग्रामिण रुग्णालय विरार येथे वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००) संवर्गाची ३ पदे मंजूर असून त्यापैकी स्त्रीरोगतज्ञाचे पद रिक्त आहे. बालरोगतज्ञ व भुलतज्ञांची पदे भरलेली आहेत. तथापि, बालरोगतज्ञ माहे ऑक्टोबर, २०१६ पासून निलंबित आहेत. उपलब्ध वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक रुग्णसेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००) संवर्गाची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००) संवर्गाची रिक्त पदे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत walk in interview च्या माध्यमातून भरण्याची कार्यवाही जिल्हा स्तरावर सुरु आहे.

ग्रामिण रुग्णालय विरार येथे प्रयोगशाळा चाचण्या, लहान शस्त्रक्रिया, मोठया शस्त्रक्रिया व प्रसुती या सुविधा उपलब्ध आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, औरंगाबाद येथील**
**विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय सुरु करण्याबाबत**

**(२३) * २८८९५ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकिय महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी घाटी परिसरात १ वर्षापासुन ग्रंथालय इमारत बांधुन तयार असून ग्रंथालय सुरू झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या जुन्या इमारतीत ग्रंथालय सुरू असून सदर इमारतीची दूरवस्था झाल्याने विद्यार्थी तेथे अभ्यासाला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने विद्यार्थ्यांची गैरसोई दूर करुन सोई-सुविधासह नवीन ग्रंथालय उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद या संस्थेची नविन इमारत हस्तांतरणासाठी संस्थास्तरावर समिती गठीत करण्यात आली असून त्यामधील किरकोळ स्वरुपाचे कामे पुर्ण झाल्यानंतर ग्रंथालय सुरु करण्यात येईल.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नंदुरबार तालुक्यातील अमरावती नदीचे पाणी बलदाने**
**येथील एम.आय.टँक मध्ये टाकण्याबाबत**

**(२४) * ३०५७६ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार तालुक्यातील अमरावती नदीचे पाणी बलदाने येथील एम.आय.टँक मध्ये टाकण्याची मागणी शेतक-यांनी अनेक वर्षापासून करुनही याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) जिल्हा नियोजन समिती, नंदूरबार यांनी उपलब्ध करुन दिलेल्या निधीनुसार काम प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत ४०% काम झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान केंद्रातून आरोग्य विभागाचे डॉक्टर काढून घेतल्याबाबत**

**(२५) * २७२११ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान केंद्रातून आरोग्य विभागाचे डॉक्टर काढून घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रूग्णालयाकरीता अनुसूचित जाती उपयोजनेतून सन २०१४ मध्ये रूपये २०९ कोटी मंजूर करण्यात येवून सदर निधी ५ वर्षात टप्याटप्याने देण्याचे ठरविण्यात येवूनही निधी प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) संस्थेच्या जमिनीसंदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही प्रलंबित आहे.

-----------------

## उपजिल्हा रुग्णालय (ता.कर्जत, जि.रायगड) येथील जैविक कच-याची विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दती करण्याबाबत

**(२६) * २८१०६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रूग्णालयातून निघणाऱ्या जैविक कच-याची विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने लावणे ही जबाबदारी त्या त्या रूग्णालयाची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील कर्जत उपजिल्हा रूग्णालयात निर्माण होणारा कचरा संकलित करून विल्हेवाट लावण्यासाठी ठाणे येथे पाठविला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जत उपजिल्हा रूग्णालयात गोळा होणारा कचरा हा दवाखान्याच्या आवारात असलेल्या शवविच्छेदन गृहाच्या बाजून टाकून जाळल्याने रूग्णालय परिसरात राहणा-या नागरिकांसह रूग्णालयातील रूग्णांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. शवविच्छेदन गृहाजवळील झाडांचा जमा झालेला पालापाचोळा एकत्र करुन जाळण्यात आला होता.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## युसुफवडगाव (ता.केज, जि.बीड) येथील बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२७) * ३०५४३ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युसुफवडगाव (ता.केज, जि.बीड) येथील बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे सदर बंधारा कोरडा पडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

सन २०१६ च्या पावसाळ्यामध्ये सदर बंधाऱ्यामध्ये पूर्ण क्षमतेने पाणीसाठा निर्माण झालेला आहे. ग्रामपंचायत मौजे युसूफवडगाव यांनी कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग बीड यांना लिहिलेल्या दिनांक १५/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर कामांबाबत समाधान व्यक्त केले आहे.

बंधाऱ्याच्या संधानकाच्या कामाचे चाचणी निष्कर्ष घेण्यात आले असून निष्कर्ष अनुज्ञेय मर्यादेत आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्ह्यात वैद्यकिय शिक्षण संकुल उभारण्याबाबत

**(२८) * २९६२५ श्रीमती स्मिता वाघ, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उत्तर महाराष्ट्रासाठी जळगांव येथे रुपये ५८५ कोटी खर्च करुन वैद्यकीय दंत आयुर्वेद, होमिओपॅथी भौतिकोपचार व महाविद्यालयाची निर्मिती करुन जिल्ह्यात वैद्यकीय शिक्षण संकुल (मेडीकल हब) उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मेडिकल हबमध्ये परिचारीका प्रशिक्षण, वैद्यकीय महाविद्यालय, दंत महाविद्यालय या बाबी प्रस्तावित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उत्तर महाराष्ट्रात सुपर स्पेशालिटी सुविधा उपलब्ध होण्यासाठी सदरचा निर्णय घेतला असताना मराठवाड्यासारख्या दुष्काळग्रस्त भागात असे "मेडीकल हब" करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या मेडीकल हब मध्ये कोणकोणत्या सोई-सुविधा प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर मेडिकल हब मध्ये नर्सिंग महाविद्यालय अंतर्भूत नाही.

(३) मराठवाडयात मेडीकल हब तयार करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसई पंचायत समिती अंतर्गत (जि.पालघर) पारोळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचा-याने रक्कमेत गैरव्यवहार केल्याबाबत**

**(२९) * २७७४३ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई पंचायत समिती अंतर्गत (जि.पालघर) पारोळ प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णांकडून दिनांक ३० जून, २०१६ ते ४ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीतील जमा झालेली रक्कम बाह्यरुग्ण चिकित्सा फी येथील कर्मचाऱ्याने शासन खाती जमा न करता अपहार केल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची तक्रार वैद्यकीय अधिकारी यांनी संबंधित गटविकास अधिकारी यांचेकडे केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने दोषी कर्मचाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) संबंधित आरोग्य केंद्रावरील शिपायाकडे दिनांक ३/१०/२०१६ पर्यंतचे बाह्यरुग्ण विभागाचे शुल्क रुपये ७८७५/- बँकेत जमा करण्यासाठी देण्यात आले होते. तथापि दिनांक ४/१०/२०१६ पासून वैद्यकीय रजेवर असल्याने त्यांनी ती रक्कम दिनांक ९/१/२०१७ रोजी बँकेत भरणा केली. बँकेत रकमेचा भरणा उशिरा केल्याने त्यांची एक वेतनवाढ (पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता) बंद करण्याची शास्ती त्यांना देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) अर्जुना नदीवरील पुलाच्या जोडरस्त्यावरील अनधिकृत बांधकामाबाबत

**(३०) * २७७२८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, अॅड.निरंजन डावखरे, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायपाटण, बागवेवाडी, धामण पीतीढा (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील अर्जुना नदीवरील पुलाचे बांधकाम माहे मे, २०१६ मध्ये पूर्ण झाले असून पुलाच्या १५० मीटर जोडरस्त्यावर असलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१३ रोजी आदेश देऊनही सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले नसल्याने पुलावरुन वाहतुक सुरु नसल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर जोडरस्त्यावरील अनधिकृत बांधकाम निष्कासित करून नदीच्या पुलावरील वाहतुक सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, अंशत: खरे आहे. सदर पुलावरुन वाहतुक सुरु नाही.

पुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मे, २०१६ अखेर पूर्ण झाले आहे.

शासन परिपत्रक, महसूल वन विभाग दिनांक १० ऑक्टोबर, २०१३ अन्वये शासकीय जमिनीवरील अतिक्रमण प्रतिबंध करणे व झालेली अतिक्रमणे निष्कासित करण्या संदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, प्रश्नाधिन रस्त्यावरील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात न आल्याने जोडरस्त्याचे काम सुरु करणे शक्य झाले नसल्याने यापुलावरुन वाहतुक सुरु नाही.

(२) प्रश्नाधीन रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याकरीता तहसिलदार, राजापूर यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम, उपविभाग, राजापूर यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे. तथापि, अद्याप अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. त्यामुळे जोडरस्त्याचे काम सुरु करणे सार्वजनिक बांधकाम विभागास सुरु करणे शक्य झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाव्हा (ता.हदगाव, जि.नांदेड) येथील ग्रामसेवकाने ग्रामपंचायतीचा निधी हडप केल्याबाबत**

**(३१) * ३०४४१ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाव्हा (ता.हदगाव, जि.नांदेड) येथील ग्रामसेवकाने गावात कोणतेही विकासाचे काम न करता ५० हजार रुपयांचा निधी हडप केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कटंगी मध्यम प्रकल्प (जि.गोंदिया) पूर्ण करण्याबाबत**

**(३२) * २९९९९ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील कटंगी मध्यम प्रकल्प ३३ वर्षापूर्वी सुरु करण्यात आला असूनही अद्यापपर्यंत हा प्रकल्प अपुर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचा खर्च ३३ वर्षापूर्वी रुपये २.२० कोटी होता, परंतु प्रकल्पाचे काम अपूर्ण राहिल्यामुळे सदर खर्च सन २०१७ मध्ये रुपये ७०.४९ कोटी इतका झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पामुळे परिसरातील अनेक गावांना शेती व पिण्याच्या पाण्याची सोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशतः खरे आहे.

धरणाचे व मुख्य कालव्याचे काम पुर्ण झाले आहे. वितरण व्यवस्थेचे काम ८०% झालेले आहे.

(२) होय, दिनांक १५/०१/८३ चे प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पाची किंमत रुपये २.२० कोटी होती. मात्र प्रकल्प अर्थसंकल्पीत न झाल्याने दिनांक २७/०९/१९९४ अन्वये रुपये ९.६६ कोटीस नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यानंतर दिनांक २३/०१/२००५ रोजी रुपये ४०.५४ कोटीस सुधारीत मान्यता देणेत आली. प्रकल्पाची अद्यावत किंमत रुपये ७०.४९ कोटी आहे. प्रकल्पावर जानेवारी, २०१७ अखेर रुपये ६०.६२ कोटी खर्च झाला आहे.

(३) होय, कटंगी प्रकल्पातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण गोंदिया मार्फत पाणीपुरवठा योजनाद्वारे गोरेगांव तालुक्यातील १७ गांवाना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली आहे. तसेच गोंदिया येथील पोलीस मुख्यालय (कारंजा) गोंदिया यांना सुध्दा पिण्यासाठी पाणीपुरवठा करण्यात येत आहे. कटंगी प्रकल्पातून मौजा गोरेगांव, सिलेगांव, पुरगांव, गणखैरा, तुमखेडा, हिरडामाली, कटंगी व घोटी या गांवाची एकूण २०४४ हेक्टर शेती सिंचना खाली येणार आहे.

(४) प्रकल्पाचे काम जून, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भोकरदन (जि.जालना) येथील कोल्हापुरी बंधा-यांची दूरवस्था झाल्याबाबत**

**(३३) * २९२५३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) येथील जळगाव सपकाळ, तळेगांव पद्मावती, वालसावंगी, धावडा, आन्वा आदी ठिकाणी बांधण्यात आलेल्या कोल्हापुरी बंधा-यांची दूरवस्था झाली असून सिंचन विभागाचे याकडे दुर्लक्ष झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोल्हापुरी बंधा-यांची दुरुस्ती झाली असती तर सिंचनासाठी या बंधा-यातील पाण्याचा उपयोग परिसरातील शेतकऱ्यांना घेता आला असता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कोल्हापुरी बंधा-यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

भोकरदन (जि.जालना) येथील जळगांव सपकाळ, आन्वा, वालसावंगी व तळेगांव या गावांमध्ये कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, (जिल्हा परिषद) जालना कार्यालयाने कोल्हापुरी बंधा-यांची कामे पुर्ण केलेली आहेत.

त्यापैकी जळगांव सपकाळ क्र. १,३,४ या कोल्हापुरी बंधा-यांचे बांधकाम दिनांक १७/०९/२०१५ रोजीच्या अतिवृष्टीमुळे नादुरूस्त झाले आहेत. तर तळेगांव को.प. बंधा-यात दरवर्षी काही प्रमाणात पाणी अडविण्यात येते, परंतु गेट निकामी झाल्यामुळे त्याची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. वालसावंगी येथील को.प. बंधा-यात गेट टाकण्यास शेतक-यांचा विरोध आहे, तसेच आन्वा क्र.१ को.प. बंधा-याच्या संरक्षक भिंतीचे काम करणे आवश्यक आहे.

मौजे पद्मावती व धावडा या ठिकाणी जिल्हा परिषद पाटबंधारे विभाग, जालना अथवा लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, जालना यांचे मार्फत कोल्हापुरी बंधारे बांधण्यात आलेले नाहीत.

(३) उपरोक्त नमुद कोल्हापुरी बंधा-यांपैकी जळगांव सपकाळ येथील कोल्हापुरी बंधा-यांच्या दुरूस्तीसाठी कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, (जिल्हा परिषद) जालना कार्यालयाने दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, जालना तसेच दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१५ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना प्रस्ताव सादर केला आहे. आन्वा, वालसावंगी व तळेगांव या कोल्हापुरी बंधा-यांच्या विशेष दुरूस्तीचे प्रस्ताव जिल्हा परिषद विभाग, जालना कार्यालयामार्फत तयार करण्यात येत आहे. निधी उपलब्धतेच्या अधीन उपरोक्त सर्व कामांची पावसाळा पूर्व आवश्यक दुरूस्ती करण्याचे नियोजन आहे.

(४) कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

## राज्यात धरणातील पाणी मीटर पध्दतीने पुरविण्याबाबत

**(३४) * ३०३६० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोठ्या शहरांना पिण्याच्या पाण्यासाठी धरणातील बेहिशेबी पाणी उपसले जाते त्याला पायबंद घालण्यासाठी धरणातील पाणी मीटर पध्दतीनेच उचलण्याचे संबंधित महानगरपालिका व नगरपालिकांना शासन सक्ती करणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी प्रकिया केंद्रे उभारणे अनिवार्य करण्यात येणार आहे अन्यथा संबधित पालिकांचे २५ टक्के पाणी कपात करण्याचे धोरण ठरविले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऊस, केळी, द्राक्षे अशा भरपूर पाणी लागणा-या पिकांसाठी सुक्ष्म सिंचन करण्यात येणार असून त्यासाठी कायदा करण्याची जलसंपदा विभागाने तयारी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी धोरण व कायदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) बिगर सिंचन प्रयोजनार्थ पुरविण्यात येणारे पाणी घनमापन पध्दतीने पुरविण्याचे धोरण शासनाने सन २००३ मध्येच स्वीकारले आहे.

या धोरणानुसार पाणीवापर मोजण्याकरिता पाणी मोजणी यंत्र बसविणे सर्वच अभिकरणांकरिता अनिवार्य करण्यात आले आहे. मंजूर कोट्यापेक्षा जास्त पाणी वापराच्या अनुषंगाने पाणी दर पत्रकात दंडात्मक तरतूद करण्यात आली आहे.

(२) शासनाने पुणे, नाशिक व राज्यातील सर्व “ड” वर्ग महानगरपालिकांच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर केंद्र उभारण्यासाठी तरतूद समाविष्ट केली आहे. सदर तरतूदीनुसार नाशिक शहरातील ०.४ हेक्टर पेक्षा मोठ्या क्षेत्राची रेखांकने/इमारती बांधकामे, तसेच पुणे व राज्यातील सर्व “ड” वर्ग महानगरपालिकांच्या क्षेत्रातील १.०० हेक्टर पेक्षा मोठ्या क्षेत्राची रेखांकने/इमारती बांधकामे यासह उक्त शहरातील समुह गृहनिर्माण

योजना, शैक्षणिक, वाणिज्य, औद्योगिक, शासकीय व निमशासकीय संस्था, हॉटेल्स, लॉजिंग्स, हॉस्पिटल्स, गॅरेजेस व इतर हानिकारक/इमारतींसाठी सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर केंद्र उभारणे संबंधित विकासकांवर/जमीन मालकांवर अनिवार्य करण्यात आले आहे.

मात्र, तसे न केल्यास संबंधित पालिकांचे २५ टक्के पाणी कपात करण्याचे धोरण अद्याप ठरलेले नाही.

(३) व (४) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम १४(४) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणामार्फत दिनांक २५ जून, २०१५ च्या अधिसूचनेद्वारे जून, २०१८ पर्यंत राज्यातील १) टेंभू उपसा सिंचन योजना, २) भीमा (उजनी), ३) मुळा, ४) निम्न मानार, ५) हतनुर, ६) ऊर्ध्व पुस, ७) कान्होळी नाला (नागपूर) व ८) अंबोली (सिंधुदुर्ग) या प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात बारमाही पिकांना ठिबक/तुषार सिंचन पध्दत अनिवार्य करण्यात आले आहे.

वरील पथदर्शक प्रकल्पांच्या अनुभवाच्या आधारे ठिबक/तुषार सिंचनचा निर्बंध राज्यातील अन्य प्रकल्पांवर जून, २०१९ पासून लावण्यात येईल, अशी तरतुद सदर अधिसूचनेत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालखेड (जि.नाशिक) डावा कालवा आठमाही करण्याबाबत**

**(३५) * २७४०८ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालखेड (जि.नाशिक) डावा कालवा कि.मी. ११० ते १३० व वितरीका क्र. ४६ ते ५२ खरीप कालवा आठमाही करण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान बेमुदत उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पालखेड डावा कालव्याचा वहनव्यय शून्यावर आणण्यासाठी अस्तरीकरण करण्याची मागणी स्वयंसेवी संघटनांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

पालखेड डावा कालवा कि.मी. ० ते १२८ चे संपूर्ण अस्तरीकरण करावे अशी मागणी येवला तालुका जलहक्क संघर्ष समितीने दिनांक ६ जानेवारी, २०१६ च्या पत्राने संबंधित क्षेत्रिय कार्यालयास केली आहे.

(३) प्रकल्प अहवालानुसार पालखेड डावा कालवा कि.मी. ११० ते १३० मधील वितरिका क्र. ४६ ते ५२ साठी फक्त खरीपात अतिरिक्त पाणी असल्यास देणेची तरतुद आहे. तसेच पालखेड डावा कालव्याचा वहनव्यय कमी करण्यासाठी ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गळती होते अशा निवडक ठिकाणी १७८० मीटर इतक्या लांबीतील अस्तरीकरण पुर्ण झालेले आहे व सुमारे २००० मीटर साठीचे अस्तरीकरण करण्याची तरतुद उर्ध्व गोदावरी प्रकल्पाच्या प्रस्तावित एकत्रित तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अहवालात केलेली असून त्यास मान्यता देण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर छाननीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परळी वैजनाथ (जि.बीड) येथील बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळाचे कार्यालय परळी येथे ठेवण्याबाबत

**(३६) * २७८१३ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी वैजनाथ (जि.बीड) जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ कार्यालय लातूर येथे स्थलांतरीत करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयाचे स्थलांतर न करता परळी येथेच कायम ठेवण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे लेखी स्वरुपात माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

तथापि, यासंदर्भात मा.मंत्री, कामगार व भूकंप पुनर्वसन कौशल्य विकास माजी सैनिकांचे कल्याण यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) होय,

(३) व (४) याबाबतचा निर्णय झालेला नाही.

-----------------

**नंदुरबार जिल्हा व नाशिक विभागातील आरोग्य अधिका-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३७) * २७७५८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २४६७१ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००) ची मंजुर २१० पदांपैकी रिक्त असलेली ५६ पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरणेबाबतची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नंदुरबार जिल्हा आरोग्य विभागातील गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरण्याबाबतची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००) संवर्गाची रिक्त पदे संबंधित जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्यामार्फत भरण्याची कार्यवाही जिल्हास्तरावरुन करण्याबाबत कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यातील आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यात आली आहेत काय, तसेच नाशिक विभागात आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांची सद्यस्थितीत किती पदे रिक्त असून, ती केव्हापर्यंत भरणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नंदुरबार जिल्हामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००) मधील ३७ मंजूर पदांपैकी १० पदे भरलेली असून २७ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) नंदुरबार जिल्हा आरोग्य विभागातील गट-क व गड-ड ची रिक्त पदे भरण्यासाठी उमेदवारांच्या लेखी परीक्षा घेण्यात आल्या असून भरतीप्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(३) होय.

(४) नंदुरबार जिल्हयातील आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे. नाशिक विभागात गट-अ ते गट-ड मधील ६३१८ मंजूर पदांपैकी ४८८९ पदे भरण्यात आली असून १४२९ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा नियोजन समितीने तिर्थक्षेत्र विकास निधीचे प्रस्तावास तांत्रिक मान्यता दिल्याबाबत**

**(३८) * ३०६३१ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा परिषदेमार्फत जिल्हा नियोजन समितीने तिर्थक्षेत्र विकास निधीच्या प्रस्तावाला मान्यता देताना शासन निर्णयाचे उल्लंघन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर व त्यांना पाठीशी घालणाऱ्या वरिष्ठ अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत सहाय्यक प्राध्यापकांना शासन सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत**

**(३९) * २८७१३ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अनेक वर्षापासून सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम करणारे ७०० प्राध्यापक अस्थाई स्वरुपात कार्यरत असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर वैद्यकिय महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही

(२) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अस्थायी स्वरुपात कार्यरत असलेल्या सहायक प्राध्यापकांपैकी ज्यांची सेवा दिनांक ३०/७/२०१६ रोजी किमान २ वर्षे इतकी झाली आहे, अशा १५९ अध्यापकांच्या सेवा दिनांक २४/१०/२०१६ पासून नियमित करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला असून त्यानुसार सदर अध्यापकांना सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुळशी व वेल्हा तालुक्यातील (जि.पुणे) अंगणवाड्यांसाठी इमारत बांधण्याबाबत**

**(४०) * २६९३४ श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी व वेल्हा तालुक्यातील (जि.पुणे) ६६ अंगणवाड्यांसाठी स्वत:ची इमारत नसल्याने तेथील अंगणवाडया इतरत्र भरविल्या जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ६६ अंगणवाडयांसाठी स्वत:ची इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) मुळशी व वेल्हा तालुक्यामध्ये सन २०१४-१५ मध्ये अनुक्रमे ३ व ७ सन २०१५-१६ मध्ये अनुक्रमे ५ व ६ व सन २०१६-१७ मध्ये अनुक्रमे १ व ३ अंगणवाडी इमारत बांधकामे मंजूर करण्यात आलेली असून उर्वरित बांधकामे निधी व जागा उपलब्धतेनुसार मंजूर करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---------------

**परभणी येथे स्त्री रुग्णालयास मान्यता देण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४१) * २९३८१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथे ६० खाटांच्या स्त्री रूग्णालयास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रूग्णालयासाठी लागणारी जागा, मंजुरी, निधीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक ३१/०६/२००६ अन्वये यापूर्वीच मान्यता दिल्यानुसार परभणी येथे ६० खाटांचे स्त्री रुग्णालय कार्यान्वित आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**शासकिय वैद्यकिय महाविद्यालय (मेडीकल) नागपूर येथील रूग्णांना फाटके कपडे वापरण्याकरीता दिल्याबाबत**

**(४२) * २७३४० प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय वैद्यकिय महाविद्यालय (मेडीकल) नागपूर येथील रूग्णांकरीता वापरण्यात येणारे कपडे हे कमी दर्जाचे असून रूग्णांना फाटके कपडे वापरावे लागत असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आंबेत (ता.महाड, जि.रायगड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची दूरवस्था झाल्याबाबत**

**(४३) * ३०२७३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेत (ता.महाड, जि.रायगड) गावामध्ये केंद्र शासनाच्या मदतीने सन १९८७ मध्ये रुग्णांना आरोग्यसेवा मिळावी म्हणून उभारण्यात आलेल्या आरोग्य केंद्राची दूरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राथमिक आरोग्य केंद्राची दुरवस्था झाल्याने गंभीर आजारी रूग्णांना महाडच्या ग्रामिण रुग्णालयात पाठविण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर आरोग्य केंद्राच्या दुरवस्थेमुळे जून्या इमारतीच्या सभोवताली झाडे झुडपे वाढल्यामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी तसेच डॉक्टरांना राहण्यासाठी उभारण्यात आलेली इमारतही मोडकळीस आल्याने सदरहू आरोग्य केंद्रातील कोटयवधी रूपयांची साधनसामुग्री वापराविना आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे. सन १९७८ मध्ये केंद्र शासनाच्या योजनेतून आंबेत (ता.महाड, जि.रायगड) येथे ग्रामिण कुटुंब कल्याण केंद्र सुरु झाले. सन २००५ मध्ये सदर योजना बंद झाली. सन २००५ मध्ये आरोग्य उपकेंद्र आंबेतची स्थापना करण्यात आली आहे. सदर उपकेंद्रामार्फत सध्या आरोग्यसेवा देण्यात येतात. सद्य:स्थितीत सदर इमारत जुनी झाली आहे.

(२) हे खरे नाही. सन २००५ मध्ये आरोग्य उपकेंद्र, आंबेतची स्थापना करण्यात आली आहे. सदर उपकेंद्रामार्फत सध्या आरोग्य सेवा देण्यात येतात. आरोग्य संस्थांच्या बृहत आराखडयात सन २०१३ मध्ये आंबेत येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आलेले आहे. उपकेंद्रात प्राथमिक उपचार दिले जातात व गंभीर रुग्णांना संदर्भित करण्यात येते.

(३) नाही. आंबेत येथील ग्रामिण कुटुंब कल्याण केंद्र सन २००५ मध्ये बंद झाल्याने व सदर इमारत जुनी झाल्याने इमारतीचा वापर होत नाही. तथापि या आवारात उपकेंद्राची प्रसुतीगृह इमारत सन २००८ मध्ये बांधली असल्याने सदर इमारतीमध्ये उपकेंद्रामार्फत आरोग्य सेवा दिल्या जात आहेत. सदर इमारतीत कोणतीही यंत्रसामुग्री उपलब्ध नाही.

(४) आरोग्य संस्थांच्या बृहत आराखडयात सन २०१३ मध्ये आंबेत येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आलेले आहे. हे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची व जिल्हा नियोजन समितीची मान्यता मिळाली आहे. सन २०१७-१८ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाची प्रक्रिया सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येईल व सदर बांधकाम प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पदनिर्मिती करुन हे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दामोधरवाडी आणि रेडेवस्ती (ता.वडवणी, जि.बीड) येथील कोल्हापुरी बंधाऱ्याच्या कामाची ई-निविदा नियोजनपूर्वक केल्याबाबत

**(४४) * ३०५७१ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दामोधरवाडी आणि रेडेवस्ती (ता.वडवणी, जि.बीड) येथील कोल्हापुरी बंधाऱ्याच्या कामाची ई-निविदा नियोजनपूर्वक केल्याची तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हाधिकारी बीड कार्यालयामार्फत तसेच गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालयाच्या अधिनस्त अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण बीड यांनी तक्रारीची शहानिशा केली असून या प्रकरणात कोणीही दोषी आढळून आलेले नाही.

तसेच याबाबत तक्रारदार सुगणेश मजुर सहकारी संस्था मु.पाली, ता.जि.बीड यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना लिहिलेल्या दिनांक २५/७/२०१६ च्या पत्रान्वये खोट्या माहितीच्या आधारे व गैरसमजुतीमुळे संदर्भीय तक्रार दिल्याचे कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळगांव जिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४५) * २९०४० श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हा रुग्णालयात एक तृतीयांश पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांना वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांअभावी खाजगी रुग्णालयात जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, जळगाव येथे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००) संवर्गाची १९ पदे मंजूर असून त्यापैकी ६ पदे भरलेली व १३ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००) संवर्गाची ३५ पदे मंजूर असून त्यापैकी ३३ पदे भरलेली व ०२ पदे रिक्त आहेत.

तसेच, जिल्हा रुग्णालय जळगाव येथे गट-क संवर्गाची एकूण ३०५ पदे मंजूर असून त्यापैकी २०५ पदे भरलेली व १०० पदे रिक्त आहेत. गट-ड संवर्गाची एकूण १९३ पदे मंजूर असून त्यापैकी १३९ पदे भरलेली व ५४ पदे रिक्त आहेत.

उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णांना आवश्यक त्या रुग्ण सेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००) संवर्गाची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००) संवर्गाची रिक्त पदे जिल्हाधिकारी यांच्यामार्फत walk in interview च्या माध्यमातून भरण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.

तसेच गट-क व गट-ड संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आबिटघर (ता.वाडा, जि.पालघर) येथील रोजगार हमी योजनेंतर्गत शाळा मैदान सपाटीकरणाच्या कामाची रक्कम मजुरांना अदा करण्याबाबत**

**(४६) * २७८२३ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आबिटघर (ता.वाडा, जि.पालघर) येथील शाळा मैदान सपाटीकरणाचे काम माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामावर ३१ मजुरांनी काम करुनही मजुरीची रक्कम रुपये ५८ हजार ५१२ त्यांना अद्याप अदा करण्यात आली नसून सदर कामाचा निधी शासनाकडून अप्राप्त असल्याचे रोजगार हमी योजनेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे आहे.

(२) सदर कामावरील ३१ मजूरांना त्यांनी केलेल्या कामाची रक्कम विलंब शुल्कासह अदा करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## तारामुंबरी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील मुरमणे-जामसंडे येथील नदीचे पाणी अडवून धरण बांधण्याबाबत

**(४७) * ३०५९९ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारामुंबरी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथील मुरमणे-जामसंडे येथील नदीकाठच्या गावांना पाणी टंचाई असल्याने तारामुंबरी, भटवाडी, कानखोल, मिठमुंबरी या गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत त्याठिकाणी पावसाचे पाणी अडवून धरण बांधण्याबाबतची मागणी ग्रामस्थांनी दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात नदीचे वाहून जाणारे पाणी अडविण्याकरिता व सदर गावांचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी धरण बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) विषयांकीत ठिकाणी प्राथमिक पाहणी करण्याच्या सूचना विभागीय कार्यालयास देण्यात आलेल्या आहेत. प्रकल्पासाठी जागा योग्य असल्यास त्यानुसार सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपळगांव देपूळ (जि.वाशिम) येथील गाव तलावाच्या भिंतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) * २९२५७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगांव देपूळ (जि.वाशिम) येथील २०० एकर सिंचन क्षमता असणाऱ्या जिल्हा परिषद लघुसिंचन विभागामार्फत बांधण्यात आलेल्या गाव तलावाच्या भिंतीचे काम व्यवस्थित झाले नसल्याने गेल्या १५ वर्षापासून या तलावात पाणी साचत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाव तलावात पाणी साठवण झाल्यास जमिनीतील पाण्याचा स्तर उंचावून जवळपास २०० एकर क्षेत्र सिंचनाखाली येईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गाव तळ्याच्या भिंतीचे काम न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

पिंपळगांव देपूळ (जि.वाशिम) येथे संपुर्ण ग्रामिण रोजगार योजनेंतर्गत सन २००४-२००५ मध्ये गाव तलावाचे काम लघुसिंचन उपविभाग जिल्हा परिषद, वाशिम मार्फत पूर्ण करण्यात आले असून साठवण क्षमता ७२.०२ स.घ.मी. एवढी आहे. दरवर्षी साधारणत: माहे सप्टेंबर अखेरपर्यंत तलावात पाणी साठा उपलब्ध असतो.

(२) व (३) हे खरे नाही.

सदर तलाव हा गाव तलाव या प्रकारात बांधण्यात आल्याने त्यामधून सिंचन निर्मिती करणे हा तलावाचा हेतू नाही.

जलयुक्त शिवार अभियान २०१५-१६ अंतर्गत सदर तलाव दुरुस्तीचे रुपये १४,८१,५००/- किंमतीचे अंदाजपत्रक लघुसिंचन विभाग, जिल्हा परिषद, वाशिम यांनी दिनांक ०१/०३/२०१७ रोजी जिल्हाधिकारी, वाशिम कार्यालयास मान्यतेसाठी सादर केलेले आहे. मान्यतेनंतर लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद, वाशिम मार्फत सदर तलाव दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुपोषणग्रस्त माता आणि बालकांचे पोषण धोरण मंजूरीसाठी प्रलंबित असल्याबाबत

**(४९) * ३०३६१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एप्रिल, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या पाच महिन्यात सुमारे आठ हजार नवजात अर्भके दगावली असून सहा वर्षापर्यंतच्या सुमारे १७०० बालके व २३४ माता दगावल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुपोषणग्रस्त माता आणि बालकांच्या पोषणबाबतचे शासनाचे धोरण सार्वजनिक आरोग्य विभागाकडे दीड वर्षापासून मंजूरीसाठी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील कुपोषणग्रस्तांना दिलासा देण्यासाठी शासनाने या धोरणाला मंजूरी देवून त्याची अंमलबजावणी सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या पाच महिन्यात राज्यात डीएचआयएस २ च्या अहवालानुसार ६१४८ नवजात अर्भकांचा व सहा वर्षापर्यंतच्या ६३८० बालकांचा मृत्यू झाल्याचा अहवाल प्राप्त आहे.

तसेच माहे एप्रिल, २०१६ ते नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत राज्यामध्ये एकूण ८८१ माता मृत्यू झाले आहेत.

(२) व (३) राज्यामध्ये माता, अर्भक, बालक व किशोरवयीन मुलांसाठी व सर्व वयोगटातील सर्व समावेशक पोषण धोरण तयार करण्याची बाब विविध विभागांशी संबंधित असल्याने सर्वंकष बाबींचा विचार करुन  सर्व समावेशक पोषण विषयक धोरण मसुदा संबंधित/घटक विभागांच्या संमतीने तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यात बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेष नवजात शिशु कक्ष ३६ व नवजात स्थिरीकरण कक्ष १६६ ची स्थापना, बालकांना लसीकरण तसेच आदिवासी कार्यक्षेत्रामध्ये आशा मार्फत गृह भेटी द्वारे नवजात बालकांची तपासणी उपचार, मातांना समुपदेशन इत्यादी सेवा विभागामार्फत सुरु आहे.

तसेच राज्यातील माता मृत्यू टाळण्यासाठी गरोदर मातांची प्रसुतीपूर्व तपासणी धनुर्वाताची लस, प्रतिबंधात्मक उपचार, मोफत आहार व वाहन व्यवस्था इत्यादी सेवा देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दमणगंगा-गोदावरी व वैतरणा-गोदावरी या नदीजोड प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल प्रलंबित असल्याबाबत

**(५०) * २७४११ श्री.जयवंतराव जाधव : दिनांक १७ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक १९५४० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील तुटीच्या गोदावरी खोऱ्यात अतिरिक्त पाणी उपलब्ध करण्याकरिता दमणगंगा-गोदावरी नदीजोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी शासनाने माहे मार्च, २०१५ मध्ये राष्ट्रीय जलविकास अभिकरणास विनंती करूनही, सदर अभिकरणाने माहे जानेवारी, २०१७ पर्यंत शासनास सविस्तर प्रकल्प अहवाल दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैतरणा-गोदावरी या नदीजोड प्रकल्पासाठी सुधारित प्राथमिक व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी शासनाने राष्ट्रीय जलविकास अभिकरणाकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान विनंती केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय जलविकास अभिकरणाकडून प्रश्न भाग (१) व (२) बाबतचे अहवाल लवकरात लवकर मिळण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

दमणगंगा (एकदरे)-गोदावरी खोरे या आंतरदेशीय नदीजोड योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची विनंती राज्य शासनाने राष्ट्रीय जलविकास अभिकरणास दिनांक १२ मार्च, २०१५ चे पत्राने केलेली होती.

(२) होय.

(३) दमणगंगा (एकदरे)-गोदावरी नदीजोड प्रकल्प व वैतरणा-कडवा-देव नदीजोड प्रकल्प यांचा एकत्रित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत दिनांक १७ मे, २०१६ च्या शासन पत्रान्वये राष्ट्रीय जलविकास प्राधिकरणास विनंती करण्यात आलेली आहे. तसेच शासनाच्या दिनांक २३ नोव्हेंबर, २०१६ च्या पत्रान्वये सदर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठीची सल्लामसलत फी देण्यास सहमती दर्शविलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रसुतीपुर्व लिंग निदान प्रतिबंधक कायद्याबाबत

**(५१) * २७७५९ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३५४२ ला दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रसुतीपुर्व लिंग निदान प्रतिबंधक कायद्याबाबत राज्य शासनाच्या कक्षेतील बाबींच्या अनुषंगाने Standard Operating Procedure (SOP) तयार करण्याचे सुरु असलेले काम पुर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कायद्याचा योग्य वापर होत नसल्याने निर्दोष डॉक्टरांना त्रास होत असल्याचा आरोप करून राज्यातील हजारो रेडिओलॉजिस्ट डॉक्टरांनी सप्टेंबर, २०१६ मध्ये केलेल्या संप आंदोलनाच्या पार्श्वभुमीवर Standard Operating Procedure (SOP) बाबत शासनाने कोणता निर्णय घेतला, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) दिनांक १८/०८/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मा. प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीने सादर केलेल्या Standard Operating Procedure (SOP) च्या प्रस्तावित मसुदयावर कार्यवाही सुरु आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड सामान्य रूग्णालयातील सिटी स्कॅन मशिन बंद असल्याबाबत

**(५२) * ३०५७९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा सामान्य रूग्णालयातील सिटी स्कॅन मशिन व इतर उपकरणे अनेक दिवसांपासून बंद असल्याने रूग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रूग्णालयातील कोणकोणती उपकरणे किती दिवसापासुन बंद पडलेली आहेत तसेच सिटी स्कॅन मशिनच्या दुरूस्तीसाठी दिनांक ३० जानेवारी, २०१७ अखेर पर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

बीड जिल्हा सामान्य रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन दिनांक २९/३/२००४ ते दिनांक २२/५/२०१६ पर्यंत कार्यान्वित होती. सद्य:स्थितीत सदर मशीन बंद आहे. तथापि, सी.टी.स्कॅन मशिनची सुविधा वगळता रुग्णांच्या सेवेसाठी आवश्यक असलेली उपकरणे चालु आहेत. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.
(२) सी.टी.स्कॅन, व्हेन्टीलेटरसह काही सयंत्रे गेल्या काही दिवसांपासून नादुरुस्त आहेत. सी.टी.स्कॅन मशीनच्या दुरुस्तीसाठी दिनांक ३०/०१/२०१७ पर्यंत रुपये ६७,२९,७२५/- इतका खर्च झालेला आहे.
(३) सी.टी.स्कॅन व क्ष-किरण मशीन निर्लेखित करण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित २५ सयंत्रे ही मे. फेबर सिंदुरी मॅनेजटमेंट प्रा.लि., चेन्नई यांचेकडुन दुरुस्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.